उप संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन-२०१७ मधील बदल्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.बदली-५८१७/७३५/प्र.क्र.९४ (भाग-२)/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ मे, २०१८.

<u>वाचा</u> :- १. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/बदल्या-२०१७/प्रशा-१/८, दि.२६.०४.२०१७.
२. नगर विकास विभाग, शासन समक्रमांकाचा दि.२५.०७.२०१७ चा शासन निर्णय.
३. नगर विकास विभाग, शासन समक्रमांकाचा दि.१४.०२.२०१८ चा शासन निर्णय.
४. नगर विकास विभाग, शासन समक्रमांकाचा दि.१५.०२.२०१८ चा शासन निर्णय.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार उप संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन-२०१७ मधील मध्यावधी बदल्या करण्याबाबत नगर विकास विभाग, शासन समक्रमांकाच्या दि.१४.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शासन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. आता सदर दि.१४.०२.२०१८ च्या समक्रमांकाच्या शासन निर्णयातील बदली / प्रतिनियुक्तीने पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन त्यांच्या बदली / प्रतिनियुक्तीबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व कलम ४ (५) मधील तरतुदींनुसार व प्रशासकीय कारणास्तव खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार उप संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदली / प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहेत.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्या कार्यरत असलेले कार्यालय	बदलीनंतरचे कार्यालय
१	श्री. अ. ग. गिरकर	उप संचालक, नगर रचना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (प्र.नि.)	उप संचालक, नगर रचना, प्रादेशिक योजना, लातूर
२	श्री. उ. ना. लोंढे	उप संचालक, नगर रचना, प्रादेशिक योजना, नांदेड.	उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.

०२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील अधिकाऱ्यांना बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याकरिता आवश्यक ते कार्यकारी आदेश तातडीने निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

०३. या आदेशान्वये बदली / प्रतिनियुक्ती करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे बदली / प्रतिनियुक्तीबाबतचे कार्यकारी आदेश प्राप्त होताच बदलीच्या ठिकाणी तातडीने रुजू व्हावे.

०४. उपरोक्त विवरणपत्रातील अधिकाऱ्यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना करण्यात येत असल्याने त्या अधिकाऱ्यांना नियमानुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधी व संयुक्त बदली अनुदान मंजूर करण्यात यावे.

०५. सदरहू आदेशान्वये बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच राजकीय दबावाबाबतची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

०७. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, श्री. अ. ग. गिरकर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या उप संचालक, नगर रचना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (प्र.नि.) या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. उ. ना. लोंढे यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात यावा. परंतु, कोणत्याही परिस्थितीत बदली होणाऱ्या अधिकाऱ्याकडे त्याच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

०८. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०५२४१४४७३७४९२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.05.24 15:58:05 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी --यांना,
(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत.)

प्रत :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५. मा. मुख्य मंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
८. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. **(३-प्रती)**
९. सर्व सह संचालक, नगर रचना------------------------.
१०. उप सचिव (नवि-३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई